वॉरियर तायक्वांदो अकादमी
योद्धा बना, चिंता सोडा!
तज्ज्ञ ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण
आजच जॉईन करा
शाखा : जुईनगर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे
9821143012 @warriortaekwondoacademy

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
माणसाला आपल्या दारिद्र्याची
लाज वाटता कामा नये.
लाज वाटायला पाहिजे ती दुर्गुणांची.
– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

वर्ष : ०५ | अंक : २७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.११ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

पाहिजेत !! पाहिजेत !!
२० इंटरसिटी बसेससाठी
४० ड्रायव्हर्स...
२० हेल्पर्स पाहिजेत...
सचखंड बस सर्व्हिस
ट्रान्सपोर्ट– नगर, निगडी, पुणे – ४४.
: संपर्क :
पाटोळे : ९३२६८४३१७२ शितोळे : ९८८१६५७७१६

## नेपाळमधील हिंसाचारामुळे भारत–नेपाळ सीमेवर हाय अलर्ट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नवी दिल्ली :** भारताने नेपाळमधील सोशल मीडियावरील बंदी व भ्रष्टाचाराविरोधात उसळलेल्या हिंसक आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सीमेवरील सुरक्षा आणखी कडक केली आहे. आंदोलनाची तीव्रता वाढल्याने पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी राजीनामा दिला आहे. या घडामोडींनंतर भारताने नेपाळ सीमेवर उच्चस्तरीय सुरक्षा वाढवली आहे. अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सशस्त्र सीमा बल (SSB) आणि राज्य पोलिसांचे पथक एकत्रितपणे सीमेवर तैनात करण्यात आले आहे. कोणताही भारतीय भूभागात कोणत्याही तणावाचा फटका बसणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. 'नेपाळमधील परिस्थिती लक्षात घेऊन भारत–नेपाळ सीमेवर सतर्कतेचा इशारा दिला आहे. (SSB) बारकाईने नजर ठेवून आहे,' असे एका अधिकाऱ्याने एएनआयला सांगितले.




**भारत–नेपाळ सीमेचे स्वरूप !**

भारत आणि नेपाळ यांच्यात १,७५१ किमी लांबीची खुली सीमा आहे. जी उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, सिक्कीम आणि पश्चिम बंगाल या राज्यांतून पसरली आहे. १९५० च्या शांतता व मैत्री कराराअंतर्गत दोन्ही देशांच्या नागरिकांना मुक्तपणे ये–जा करण्याची मुभा आहे. ज्यामध्ये कोणत्याही निर्बंधाशिवाय नागरिकांसोबतच वस्तूंची वाहतूक होऊ शकते.

मात्र सध्याच्या तणावामुळे हालचालींवर बंधने आणण्यात आली आहेत. उत्तर प्रदेशातील लखीमपूर खीरी जिल्ह्यातील गौरिफंटा सीमेवर सुरक्षा दलांनी नेपाळी नागरिकांना भारतात प्रवेश देण्यास मज्जाव केला आहे. मात्र भारतातील नागरिकांना त्यांच्या देशात परतण्याची परवानगी देण्यात आली आहे. तशीच पावले नेपाळ सरकारनेही उचलली असून भारतीय नागरिकांना प्रवेशबंदी केली आहे, परंतु भारतात काम करणाऱ्या नेपाळी नागरिकांना परतण्याची मुभा आहे.

**व्यापार आणि वाहतुकीवर परिणाम!**

दरम्यान, पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील पनिटंकी सीमावर्ती शहरात मालवाहू ट्रक अडकून राहिले आहेत. तणावाच्या वातावरणामुळे व्यापारात अंशतः खंड पडला आहे. दार्जिलिंग पोलिस अधीक्षक प्रवीण प्रकाश यांनी सांगितले, 'सीमेजवळ पोलीस चौकी उभारण्यात आली असून अतिरिक्त फौज तैनात आहे. आम्ही पूर्ण सतर्कता बाळगून आहोत आणि परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहोत.' अशाच प्रकारच्या सतर्कतेची उपाययोजना उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार आणि इतर सीमावर्ती राज्यांत देखील लागू करण्यात आली आहे.

## वाचक पत्र

### ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारल्यास शहरांचा ताण हलका होईल

शहरात खूपचं दाटीवाटी झाली आहे आणि प्रत्येकाला गैरसोयीचे होईल इतका भार पृथ्वीवरील संसाधनांवर आला आहे. दुसरीकडे, हवामानातील बदल, परिणामी पूर, उष्णतेची लाट आणि टोकाच्या हवामानाचा त्रास, सतत सुरू असलेले संघर्ष आणि बिघडत चाललेल्या भविष्याची भीती वाढवणाऱ्या साथीच्या रोगांचा धोका यांमुळे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे झाले असल्याचे दिसून आले आहे. त्याच वेळी, मोठाल्या शहरांमध्ये त्यांच्या क्षमतेच्या पलीकडे अनिश्चितपणे घनता वाढत राहील, ज्यामुळे पायाभूत सुविधांची कमतरता निर्माण होते व अशा सुविधा पुरविण्यात अपयश येते आणि एखादे ठिकाण राहण्यास योग्य अथवा चांगले असण्याचे प्रमाण बिघडते. मोठाली महानगरे उत्पादकतेत तडजोड झाली तरीही अधिक संपत्ती निर्माण करतील, मात्र त्यातील नागरिकांचे हाल वाढतील. शहरात येणार्या प्रत्येक व्यक्तीला सामावून घेणे म्हणजे त्यांच्या बहुविध गरजांसाठी जागा तयार करणे– निवास, कामाची जागा, मनोरंजन, शिक्षण, आरोग्य सेवा, पाणी, स्वच्छता आणि कचरा विल्हेवाट या त्या गरजा होय. हे सगळे पुरवताना शहराच्या पर्यावरणीय शाश्वततेची किंमत मोजावी लागते ठाणे जिल्ह्याची मतदार संख्या वाढत आहे तशी लोकसंख्येत हि वाढ होते आहे मुंबई, पालघर, रायगड या महानगरातील मतदार संख्या झपाट्याने वाढत आहे सरकार सर्व सोयुनियुक्त शहरे पाहून उद्योगधंद्यांना चालना देते कामासाठी अनेक ठिकाणाहून लोक शहरांमध्ये येतात त्यामुळे सरकारने ग्रामीण भागात छोटे – मोठे उद्योगधंदे उभारणी करुन शहरी भागाकडे जाणारे लोंढे थांबवणे गरजेचे आहे त्यामुळे शहरांचा ताण हलका होवून ग्रामीण भागाला उभारी मिळेल !

**– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## जनसुरक्षा कायदा म्हणजे दडपशाहीचे धोरण ! बल्लारपूरात मविआचे धरणे आंदोलन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, विसापूर (चंद्रपूर) :** केंद्र व राज्य सरकार जनसुरक्षा कायद्याद्वारे लोकशाही व्यवस्थेचा गळा घोटत आहे. राज्यातील महायुतीच्या सरकारने महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा अंमलात आणण्यासाठी वाटचाल सुरु केली आहे. जनविरोधी कायदा करण्याची मागणी धरणे आंदोलनातून आज मंगळवार ( दि. १०) रोजी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करून केली.

बल्लारपूर येथील नगरपालिकेच्या समोर धरणे आंदोलनातून जनसुरक्षा कायदा म्हणजे दडपशाहीचे धोरण असा तीव्र निषेध केला. महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक हे लोकशाही विरोधी आहे. दरम्यान महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना मालार्पण करून अभिवादन केले. धरणे आंदोलनातून जनसुरक्षा कायद्याचा प्रखर विरोध करण्यात आला. घोषणाबाजी करून महायुतीच्या सरकारच्या जनविरोधी धोरणाचा निषेध करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव घनश्याम मुलचंदानी, रोशनलाल बिट्टू, शहर कांग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र आर्य, शिवसेना (उबाठा) चे उपजिल्हा प्रमुख विनोद उर्फ सिक्की यादव, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष बादल उराडे, बल्लारपूर तालुका कांग्रेसचे अध्यक्ष गोविंदा उपरे, कांग्रेसच्या जेष्ठ नेत्या डॉ. रजनी हजारे, माजी अध्यक्ष अब्दुल करीम, माजी नगराध्यक्ष दिलीप माकोडे, छाया मडावी, सुनंदा आत्राम, भास्कर माकोडे, ॲड.मेघा भाले, मेहमुदभाई पठाण, ॲड.पवन मेश्राम, प्रकाश पाठक, बाबा साहू, कल्पना गोरघाटे, ज्योती गहलोत, मिनाक्षी गलगट, अफसाना सय्यद, नरेश आनंद, अरबाज सिद्धीकी, अंकीत निवलकर, भारत थुलकर, प्राणेश अमराज, राकेश मुलचंदानी, इस्माईल ढाकवाला, मंगेश बावणे, नाना बुंदेल, नाजुका आलाम, वासदेव येरगुडे, नरसिंह रेब्बावार, प्रितम पाटील, सुरेश बोप्पनवार, वर्षा कडू, रेखा रामटेके, छाया शेंडे, आकाशकांत दुर्गे, दुर्गेश मुत्यालवार, रक्षित हिरणापेल्ली, ताहेर हुसेन यांच्यासह शेकडो महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा सहभाग धरणे आंदोलनात होता.

**लोकशाही विरोधी कायदा रद्द करण्याची मागणी**




## नर्तकीच्या प्रेमात उपसरपंचाचा भयंकर शेवट

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१०, सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील सासुरे गावात खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. बीडच्या गेवराई तालुक्यातील लुकामसला गावातील उपसरपंच गोविंद बर्गे यांनी स्वतःच्या कारमध्ये बसून गोळी झाडल्याची घटना समोर आली. ही घटना प्रथमदर्शनी आत्महत्या वाटत असली, तरी त्यामागे घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. नर्तकीच्या प्रेमापायी त्याने हे पाऊल उचलल्याचे बोलले जाते पोलिसांनी याप्रकरणी पुढील तपास सुरू केला आहे. कुटुंबीयांनी नर्तकीवर आरोप केले आहेत. यानुसार २१ वर्षीय नर्तिका पूजा गायकवाडविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत बर्गे यांच्या कुटुंबीयांनी गंभीर आरोप केले आहेत. तर त्यांच्या भाच्याने एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताा मोठे खुलासे केले आहेत, ज्यामुळे प्रकरणाला वेगळे वळण येण्याची शक्यता आहे. तो म्हणाला, 'माझ्या मामाकडे पिस्तूल नव्हते, तो निर्व्यसनी होता. गाडीत सापडलेल्या दारूच्या बाटल्या टाकण्यात आल्या आहेत. आमच्या मामाची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू आहे,'

कुटुंबीयांच्या माहितीनुसार, 'गेल्या सहा महिन्यांपासून बर्गे मानसिक तणावात होते. पूजा गायकवाडकडून त्यांना ब्लॅकमेल केलं जात असल्याचेही त्यांनी सांगितले. प्लॉट नावावर करून द्यावा, अशी मागणी त्यांच्याकडून वारंवार केली जात होती. राजकारण्यांनीच ही ओळख करुन दिली. केवळ पैशासाठी संबंध जोडण्यात आले,' असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

## शासनाने काढलेला जीआर त्वरित रद्द करा ; पारनेर तालुक्यात ओबीसी समाज आक्रमक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील इतर मागासवर्गीय समाजावर अन्यायकारक काढलेला जीआर तात्काळ रद्द करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

सोमवार दि.८ सप्टेंबर रोजी पारनेर तालुक्यातील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने व सकल ओबीसी समाजाच्या वतीने आक्रमक घोषणाबाजी देत तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबतचा जीआर तात्काळ रद्द करावा, या मागणीसाठी जेष्ठ नेते खंडू भूकन व समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाषराव लोंढे अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी समाजाने पारनेर तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली.



महाराष्ट्रातील ओबीसी समाजाने मराठा जातीच्या ओबीसीमधील घुसखोरीला वेळोवेळी विरोध केला आहे. मात्र तरी सुद्धा राज्य सरकार मराठा समाजासमोर झुकले आहे. २ सप्टेंबर, २०२५ रोजी हैद्राबाद गॅझेटीअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा–कुणबी किंवा मराठा कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबतचा जीआर म्हणजे ओबीसींचे आरक्षण संपविण्याचा सरकारचा कट असल्याचे यावेळी खंडू भूकन म्हणाले.

राज्य सरकारने काढलेला जीआर मागे घेण्यात यावा, मराठा समाजाचा कोणत्याही प्रकारे व कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे ओबीसीमध्ये समावेश करण्यास आमचा ठाम विरोध आहे. मराठा समाज सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास नसतानासुद्धा ५८ लाख मराठ्यांना कुणबी नोंदीद्वारे दिले गेलेले बोगस जातीचे दाखले तात्काळ रद्द करण्यात यावेत, मराठा समाजाच्या कुणबी नोंदी तपासण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आणि मराठ्यांच्या दबावाखाली पुन्हा मुदतवाढ देण्यात आलेली न्या. संदिप शिंदे समिती ही घटनाबाह्य असून ती तात्काळ बरखास्त करण्यात यावी अशा मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदारांना देण्यात आले.

यावेळी माजी सभापती खंडू भूकन, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाषराव लोंढे, तालुकाध्यक्ष नवनाथ खामकर, बबनराव घुमटकर, अनिल गाडिलकर यांच्यासह अनेक समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रम प्रभावीपणे राबविणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१०, ठाणे :** भविष्यातील पिढीला प्रदूषणमुक्त पर्यावरण देण्यासाठी सध्याच्या पिढीने स्वतःवर पर्यावरणपूरक काही निर्बंध घालून घेणे गरजेचे आहे. त्या उद्देशाने प्रत्येक वाहनाला दिले जाणारे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) हे वैध असणे गरजेचे आहे. अवैध प्रमाणपत्र निर्मितीची साखळी पूर्णतः बंद झाली पाहिजे, यासाठी भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री बोलत होते. या बैठकीला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सह सचिव (परिवहन) राजेंद्र होळकर यांच्या सह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यातील प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसी टीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे इंधन भरण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा वाहन क्रमांक स्कॅन करून तपासला जाईल. जेणेकरून त्या माध्यमातून संबंधित वाहनाच्या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वैधता कळेल. जर त्या वाहनाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र वैध नसेल तर त्या वाहनाला इंधन दिले जाणार नाही. तथापि, त्याच पेट्रोल पंपावर प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र ताबडतोब काढून देण्याची व्यवस्था देखील केली जाईल. जेणेकरून वाहन चालकाची गैरसोय होणार नाही. या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राला युनिक आयडेंटी (यूआयडी) असणार आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वेळोवेळी वैधता तपासणी केली जाऊ शकते.




भविष्यात वाहन विक्री करणाऱ्या शोरूम व वाहन दुरुस्ती करणारे गॅरेजमध्ये देखील प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात येईल. जेणेकरून रस्त्यावर चालणारे प्रत्येक वाहन हे वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असलेले असेल. ज्यामुळे प्रदूषण पातळी कमी होण्यास मदत होईल. त्याबरोबरच सध्या अवैध पद्धतीने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र काढणाऱ्या टोळीचा पडदाफाश करण्यासाठी परिवहन विभागाने मोठी धडक मोहीम राबवावी, अशा सूचनाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीत परिवहन विभागाच्या कार्यालयामध्ये आगीची पूर्वसूचना देणारी यंत्रणा लावणे, परिवहन भवन बांधकाम आदी बाबींचा आढावाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला.




## तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडली?

रशियाचं युक्रेनसोबत युद्ध सुरूच आहे. गेल्या तीन वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये संघर्ष सुरू आहे. या युद्धामध्ये आतापर्यंत या दोन्ही देशांचं प्रचंड नुकसान झालं आहे. प्रचंड प्रमाणात जीवितहानी आणि वित्तहानी झाली आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये युद्धविरामाची घोषणा व्हावी यासाठी भारतापासून ते अमेरिकेपर्यंत सर्वच देशांचे प्रयत्न सुरू आहेत, अमेरिकेकडून अनेकवेळा रशियावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, मात्र ट्रम्प यांचे सर्व प्रयत्न हे अयशस्वी ठरले आहेत.

रशिया आणि युक्रेन युद्ध सुरू असतानाच आता मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे रशियानं आता थेट पोलंडवर हल्ला केला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार रशियन सैनिकांनी पोलंडवर १९ ड्रोन हल्ले केले आहेत. ज्यातील चार ड्रोन हल्ले परतून लावल्याचा दावा पोलंडच्या सैनिकांकडून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे पोलंड नाटो देशांचा सदस्य आहे. नाटोच्या नियमानुसार नाटोच्या सदस्य असलेल्या कोणत्याही एका देशावर दुसरा देश जो नाटोचा सदस्य नाही, त्याने हल्ला केल्यास तो हल्ला संपूर्ण नाटो देशांवरील हल्ला मानला जातो. त्यामुळे रशियानं पोलंड वर केलेला हा हल्ला तिसऱ्या महायुद्धाला दिलेलं निमंत्रण मानलं जातं आहे, आता अमेरिका काय निर्णय घेणार याकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं आहे. हा डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकेसाठी मोठा धक्का मानला जात आहे, कारण सध्या अमेरिका हा नाटो देशांचं नेतृत्व करतो.

एक्सियोसच्या एका रिपोर्टनुसार बुधवारी नाटोचा सदस्य असलेल्या पोलंडमध्ये रशियाची विमानं दिसली आहेत, रशियानं हल्ला करण्यासाठी हे ड्रोन पाठवल्याचा दावा पोलंडकडून करण्यात आला आहे. मात्र दुसरीकडे अद्याप यावर रशियाकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाहीये.

**रशियानं पोलंडवर का हल्ला केला?**

पोलंडवर मिसाईल हल्ला का करण्यात आला? याबाबत रशियाकडून अद्यापपर्यंत कोणतंही स्पष्टिकरण देण्यात आलेलं नाहीये, मात्र असा अंदाज लावला जात आहे की, रशियाला युक्रेनवर हल्ला करायचा होता, मात्र ही मिसाईल चुकून पोलंडच्या हद्दीमध्ये घुसली असावीत. पोलंड हा युक्रेनचा शेजारी देश आहे. रशियाची चार क्षेपनास्त्र पाडल्याचा दावा पोलंडने केला आहे.

दरम्यान १९३९ साली पोलंडवर केलेल्या हल्ल्यानंतरच दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली होती, हिटरने पोलंडवर हल्ला केला होता. तर आता रशियाकडून पोलंडवर हल्ला करण्यात आला आहे, रशिया हा नाटोचा सदस्य देश असल्यानं आता जगाचं लक्ष अमेरिकेकडे लागलं आहे.

## माजी शिक्षक - एनसीसी अधिकाऱ्यांनी केली समुद्र किनाऱ्याची स्वच्छता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** अनंत चतुर्दशीला राज्यभर गणपती बाप्पाचे विसर्जन मोठ्या ऊत्साहात पार पडले त्या नंतर अनेक सामाजिक संस्था, व्यक्ती यांनी मुंबईतील समुद्र किनारा स्वच्छता मोहीम हाती घेतली. सायन चुनाभट्टी येथे देखील सेवानिवृत्त शिक्षक, एनसीसी अधिकारी यांनी स्वच्छता मोहीमेला आपला हातभार लावला. माजी शिक्षक तथा एनसीसी अधिकारी चंद्रकांत म्हात्रे हे निवृत्त झाले तरी त्यांना स्वच्छता केली नाही तर चैन पडत नाही.काल दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजता सायन चुनाभट्टी येथून थेट जूहू चौपाटीवर साफसफाई करण्यासाठी पोहचले. सेंट लॉरेन्स हायस्कूल सांताक्रुझ मुंबई येथील छात्र सैनिकांना सोबत घेऊन साफसफाई केली.गणपतीचे अवशेष, निर्माल्य, पुठ्ठे, लाकडी मखर फुलांच्या माळा इत्यादी वेगवेगळ्या प्रकारचा कचरा आणि निर्माल्य साफ केला एकूण २००० ते ३००० किलो एवढा कचरा गोळा केला आणि महानगरपालिकेच्या चौपाटीवर गाड्या फिरत होत्या त्या मध्ये टाकून दिला.यावेळी तिथे एनसीसी छात्र सैनिक आर.एस.पी. आणि स्काऊट आणि गाईडचे विद्यार्थी आणि विविध महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

# नेपाळमध्ये आगडोंब...!!





कव्हर स्टोरी

- शिवाजी विठ्ठल चौगुले. कागल-कोल्हापूर..

शेजारच्या घरात आग लागते, त्याची धग आपल्यापर्यंत येते; त्यामुळे नेहर्म नेहमी काळजी घ्यावी, असं म्हटलं जातं. देशाच्या पातळीवर विचार केला, तर भारताच्या शेजारी असलेल्या मित्र राष्ट्रांमध्ये ज्या घडामोडी वेगाने घडत आहेत, त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. गेली अनेक दशके शांत असलेला नेपाळ अलीकडच्या काळात अस्थितरतेच्या गर्तेत का सापडला आहे? याची कारणं त्यासाठी शोधावी लागतील. मंत्र्यांना आंदोलकांनी घरात घुसून सळो की पळो करून सोडलं, नेपाळच्या राष्ट्रपतींसह पंतप्रधान, गृहमंत्र्यांना २४ तासांत राजीनामा द्यावा लागेल, हे दोन दिवसांपूर्वी कोणाच्या स्वप्नात आले नसेल. पण, ते प्रत्यक्ष घडलं. पशुपतीनाथाच्या भूमीत जनतेचे तांडवरूपी रौद्ररूप पाहून सत्तेच्या सिंहासनावर बसलेल्यांना पायउतार व्हावं लागलं. नेपाळ सरकारने नुकतेच एक नवीन विधेयक संसदेमध्ये आणलं होतं, ज्यात परदेशात चालविणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना स्थानिक प्रतिनिधी नियुक्त करणं हे बंधनकारक केलं होतं. त्यानंतर, ४ सप्टेंबरला नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम आणि यूट्यूबसह २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. हे प्लॅटफॉर्म नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसल्याचा सरकारचा आक्षेप होता. नेपाळ सरकारने जर सोशल मीडिया ॲपवर बंदी घातली, ती सर्व अमेरिका आणि युरोपमधील असल्याने चीनमध्ये त्यावर आधीपासूनच बंदी आहे. चीनने पाश्चात्य देशांची विचारसरणी रोखण्यासाठी स्वतःचे ॲप विकसित केले आहेत. नेपाळमध्येही त्याच धर्तीवर प्रयत्न सुरू केले गेले. दुसरीकडे चिनी ॲप्सवर का बंदी घालण्यात आली नव्हती, याचंही नेपाळी जनतेला आश्चर्य वाटत होतं. नेपाळमधील युवावर्गामध्ये नेपाळ सरकारच्या या निर्णयाने प्रचंड संतापाची लाट उसळली. राजधानी काठमांडूसह देशभरात निदर्शनं उसळली. संतप्त तरुणांनी काठमांडूच्या नवीन बाणेश्वर संसद संकुलात घुसखोरी केली. पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून त्यांनी संसदेच्या आवारात घुसखोरी केली, ज्यामुळे तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान शेर बहादूर देऊबा यांच्या बुढानिलकांठा येथील निवासस्थानाचीही निदर्शकांनी तोडफोड केली. हिंसक जमावापुढे सरकारला नांगी टाकावी लागली. नेपाळमध्ये तरुणाईला 'जेन-झी' नावाने संबोधलं जातं. सोशल मीडियावरील बंदीनंतर हा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलेला दिसला.

सरकारने मोठ्या खुबीने सुप्रीम कोर्टाची ढाल पुढे करून बंदीचा आदेश आणल्याने युवा वर्गाने सुरुवातीला शांततापूर्ण आंदोलनांची शपथ घेतली. पण, पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या आणि

पाण्याच्या तोफांचा वापर सुरू केल्याने परिस्थिती चिघळली. मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. डिजिटल जगाशी जोडली गेलेली लाइफलाइन कापली गेल्याने अस्वस्थ झालेला तरुण कसा हिंसक बनतो, याचं

या निमित्ताने उदाहरण जगासमोर आलं. केवळ नेपाळमधीलच नव्हे..जगभरातील तरुण पिढी सोशल मीडियाच्या प्रभावाखाली आहे हे यातून दिसून आलं. मांजरीला घरात कोंडून ठेवलं तर ती नरडीचा घोट घेते.

आज तरुण पिढीचं तसंच झालं आहे. सोशल मीडियाचा वापर हा तरुणाईच्या जगण्याचा एक भाग बनला असल्याने, अन्य देशात जर अशा बंदीचा निर्णय झाला, तर तिथेही नेपाळसारखी स्थिती उद्भवू शकते, हा इशारा यातून मिळाला आहे. नेपाळमधील आंदोलनात २१ तरुणांचा बळी गेला आहे. सरकारने सोशल मीडियावरील बंदीचा निर्णय मागे घेण्याची घोषणा केल्यानंतरही आंदोलक शांत झाले नाहीत. आंदोलकांनी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचं निवासस्थान पेटवून दिलं. विशेष म्हणजे, आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये पंतप्रधान ओली यांच्या राजीनाम्याची मागणी होती. २०२२ च्या नोव्हेंबर महिन्यात नेपाळमध्ये झालेल्या निवडणुका या शेवटच्या सार्वत्रिक निवडणुका होत्या; नेपाळ काँग्रेस (एनसी) हा सर्वांत मोठा पक्ष ठरला असला, तरी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-माओवादी सेंटर' (सीपीएन-एमसी) ने 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-युनिफाइड-मार्क्सिस्ट लेनिनिस्ट' (सीपीएन-यूएमएल) शी युती करून सरकार स्थापन केलं. त्यानंतर राजकीय डावपेचातून चार वेळा सत्तापालट झाला आणि २०२४ च्या जुलै महिन्यात सीपीएन-यूएमएल व एनसी या पक्षांनी संधान बांधून सरकार स्थापन केले. के. पी. शर्मा ओली पंतप्रधान पदावर आले. पक्षांच्या जोड्या बदलत राहिल्या, तरी मूळ समस्या तशाच होत्या. प्रशासनासंबंधात एकमत नसणं, एकाच व्यक्तीने एकतर्फी निर्णय घेणं आणि आपल्याला निर्णयप्रक्रियेतून बाहेर ठेवलं जात असल्याची कनिष्ठ पक्षाला भीती वाटणं या बाबी सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांमध्ये दिसून येत होत्या. या आंदोलनात सहभागी असलेल्या तरुणांनी केवळ सोशल मीडिया बंदीलाच विरोध केला नाही, तर देशात वाढलेल्या भ्रष्टाचाराविरोधातही संताप व्यक्त केला आहे. हुकूमशाही वृत्तीच्या विरोधात रस्त्यावर आल्याचे विद्यार्थ्यांचं म्हणण आहे. भारत आणि नेपाळ या दोन देशांतील संबंध भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक समानतेवर आधारित आहेत. १९५० च्या शांती आणि मैत्री कराराने दोन देश जोडले गेले आहेत. या दोन देशांत रोटीबेटी संबंधांबरोबर भाषिक साम्यही आहे. भारताने आतापर्यंत नेपाळच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदानही दिलं आहे. हिंदूंची मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून ओळख असली तरी बुद्धांचं जन्मस्थान असलेलं लुंबिनी हे स्थान नेपाळमध्ये असल्याने जगभरातील बौद्धधर्मीयांना नेपाळविषयी प्रचंड आस्था आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बांगलादेश, श्रीलंका, मालदिवसह भारताच्या सीमेवरील देशात अस्थिरता आणि घुसखोरीचा प्रयत्न चीनी भाईकडून सातत्याने सुरू आहे. नेपाळमधील यादवीला तेच कारणीभूत असावेत, असा सूर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटतो आहे.

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १३० वि जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी /देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# भुके नाही अन्न, मेल्यावरी पिंडदान...

**भुके नाही अन्न ।**
**मेल्यावरी पिंडदान ।।**
**हे तो चाळवाचाळवी ।**
**केले आपणचि जेवी ।।**
**नैवद्याचा आळा ।**
**वेचे ठाकणी सकळ ।।**
**तुका म्हणे जड ।**
**मज न राखावे दगड ।।**

प्रस्तुत अभंग भक्तिमार्गासोबतच समाजाला नीतीमार्गाची सुलभ वाट दाखविणाऱ्या संत तुकारामांचा आहे. या अभंगाचा सरळ सरळ भावार्थ लक्षात घेतला तर जिवंतपणे भुकेला असताना खायला अन्न पाणी देत नाही, मात्र मेल्यावर त्याच्या नावाने पिंडदान करतात. ही तर शुद्ध फसवणूक आहे. शिजवलेल्या अन्नापैकी मृत व्यक्तीच्या नावाने थोडासा नैवेद्य ठेवतात आणि उरलेले सर्व आपणच गिळंकृत करतो. तुकाराम महाराज भगवंताला म्हणतात मला असा निर्बुद्ध दगड बनू नको!

संत तुकाराम महाराज संसारिक होते. त्याकाळी समाजात आढळणाऱ्या रूढी परंपरेवर चिंतन करून ते भाष्य करीत आणि अनीतीच्या मार्गावर चालणाऱ्यांना खडे बोल सुनावत;असे त्यांच्या वाययातून अनेकदा स्पष्ट होते.

**मातृदेवो भव: पितृदेवो भव:**

सांगणाऱ्या आपल्या संस्कृतीत आजही जिवंतपणी भुकेल्या आई-वडील अथवा आप्तस्वकीयांना वेळेवर अन्न-पाणी दिल्या जात नाही. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर मोठ्या दशक्रिया विधी,तेरावा विधी, शुद्ध पंगती श्राद्धविधी करून मृत व्यक्तीच्या नावाने सर्व समाजासाठी मिष्टांन्नाचे भोजन दिले जाते. मात्र त्यांच्या हयातीत उपेक्षा होते. काही सन्माननीय अपवाद वगळता चौफेर विपरित



चित्र आज समाजात दृष्टीस पडते. जिवंतपणी आई-वडिलांना उपाशी ठेवणारे ते मृत्यू पावल्यानंतर त्यांच्या नावाने पिंडदाना प्रसंगी, खोट्या प्रतिष्ठेपायी मोठा खर्च करतात.भोजनाच्या पंगती बसवितात आणि स्वतःच बनवलेल्या भोजनाचा मनमुराद हसतपणे आस्वाद घेतात. हे लोक नैवेद्य म्हणून देवाला आवडणारे नानाविध पदार्थ करून स्वतःच पोट भरत असतात. या कृतीतून स्वतःची काही न मागणाऱ्या देवाची देखील फसवणूक होते.कर्तव्य धर्माला विसरणारे जडबुद्धीचे लोक माझ्याकडून रक्षिले जाणारच नाहीत. मी वेळोवेळी या फसणूक करणाऱ्या लोकांना त्यांच्या कर्तव्य धर्माची आठवण करून देईल!असे संत तुकाराम महाराज म्हणतात. ही परिस्थिती जशी आज अवतीभवती दिसते.तशी त्याकाळी ही असावी म्हणून संतांनी अनीतीच्या खोट्या परंपरेवर भाष्य केलेले आहे. ते आजच्या समाजालाही लागू पडते.

दुभत्या गाई म्हशींना वेळेवर चारा टाकता. हौसेसाठी कुत्री, मांजरी पोसता. त्यांच्या भुकेचा विचार करून पौष्टिक आहार पुरविणारे, आई बापाच्या भुकेचा विचार कधी करतील?आज तीर्थक्षेत्री भीक मागणारी वयोवृद्ध मंडळी, कुंभमेळ्यात सोडलेली, विधवेला दुर्लक्षित केलेली, गावाच्या पारावर थकलेली हिरमुसलेली म्हातारी चेहरे, वृद्धाश्रमा सोबतचं त्यात कितपत पडलेली दुर्लक्षित जेष्ठ मंडळींची संख्या का वाढताहेत! याचाही विचार समाजमन करेल? ज्यांनी जन्माच्या आधीपासून तुमच्या भवितव्याचा विचार केला. एक कुटुंबप्रमुख म्हणून कुटुंबाचे संरक्षण केले.स्वतःच्या इच्छा आकांक्षा आवडीनिवडींचा विचार केला नाही, ती व्यक्ती आपले जन्मदाते असो वा पालक. जेव्हा ती वृद्धापकाळाने थकते, अंगी त्राण राहत नाही. अशा प्रसंगी खरा मानसिक आधार त्यांना हवा असतो. अपेक्षित असे घडत नाही या उलट त्यांची परवड होत असते. त्यांना उपेक्षित ठेवून पापांचे आपण कळत नकळत धनकरी होतो. उलटपक्षी त्यांच्या मृत्यू पश्चात पिंडदान, तेरवी, श्राद्धविधी करून पुण्य पदरात पाडून घेण्याचे सोंग कशाला करायचे.ही कृतघ्नता,निर्दयीपणाची, निर्बुद्धीची होत. मेलेल्याच्या नावाने कावळ्याला व गाईला नैवेद्य खाऊ घालण्यापेक्षा जिवंतपणीच त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. मेल्यानंतर तुमची पितरें कावळ्याच्या रूपाने येईल अशी निर्बुद्धी ठेवण्यासारखे दुसरे मूर्खत्व नाही. म्हणून संत तुकारामांनी एकनाथांनी,कबीरदासांनी अशा कर्मांचा धिक्कार केला आहे. खरे पुण्य कर्म जिवंतपणीच आहे, हा संत विचार मानवजीवनी अंगीकारला तर अनेक सामाजिक प्रश्न सुटायला मार्ग मोकळा होईल.



**शशिकांत तोटे**
**दारव्हा,जि.यवतमाळ**
**मो.९१३०८३५४५८**

## घासाघीस..

**भाजी पाला घेताना**
**करेकशी घासाघीस**
**महागाई भडकलेली**
**जड वाटते दहावीस**

**माजले व्यवसायिक**
**जीव का कासावीस**
**जोरदावी लहानांवर**
**ग्राहकभलते खवीस**

**चार दमडी वाचवाया**
**कितीकाढणारं कीस**
**अद्वातद्वा बोला चला**
**करी हिडीसफिडीसी**

**फळे भाजी हो ताजी**
**नकोबुवा उन्नीसबीस**
**फिरते विक्रेते मवाळ**
**आणतो मस्त जेरीस**

**स्वस्तात घेणार पाला**
**जगज्जेता मी हिडीस**
**बारगेनिंगसक्सेसफूल**
**बा कसे पाडले भरीस**

**मॉलमध्ये जाता मात्र**
**सरळयेतात ते डॅंबीस**
**टॅक्ससह ब्रॅण्डेड वस्तू**
**घेऊन येतात इब्लिस**

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शिवाजीनगर पोलिसांची मोठी कामगिरी; मोटरसायकल चोरी प्रकरणाचा पर्दाफाश

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**




**दि.१०, डोंबिवली (ठाणे) :** शिवाजीनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर क्र. ६७७/२०२५, भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत दाखल म ोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यात पोलिसांनी अवघ्या काही दिवसांतच संशयिताला जेरबंद करत चोरीस गेलेली मोटरसायकल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

गुन्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने तपास सुरू केला असता, आरोपी नाशिक येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने नाशिक येथे जाऊन आरोपीस ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने स्वतःचे नाव अनिल गणेशराव मोगल (वय २८, रा. ध्रुव नगर, नाशिक) असे सांगितले. पुढील चौकशीत त्याने मोटरसायकल चोरीची कबुली दिली असून, त्याच्याकडून चोरीस गेलेली जुपिटर मोटरसायकल पोलिसांनी जप्त केली आहे. ही यशस्वी कामगिरी शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल चौरे, पो.हवा./६३१० कैलास पादीर, पो. हवा./६३४५ विकास वळवी, पो.हवा./७३८९ सचिन देवरे, पो.शि./७७७४ हमीद शेख आणि पो.शि./५४६७ स्वप्निल गायकर यांनी केली आहे. पोलिसांच्या या तात्काळ आणि प्रभावी कारवाईमुळे परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# गणेशोत्सवात संकलित ६३.६९५ टन निर्माल्यापासून खतनिर्मिती

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि१०, नवी मुंबई :**

२७ ऑगस्टपासून अत्यंत उत्साहात संपन्न झालेला श्रीगणेशोत्सव नवी मुंबईकर नागरिकांनी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी 'पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करावा अशा केलेल्या आवाहनास चांगला प्रतिसाद देत पर्यावरणशील दृष्टीने साजरा केला. यामध्ये शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करणाऱ्या नागरिकांना 'पर्यावरणमित्र' म्हणून प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा मान राखून नागरिकांनी मोठया संख्येने ६ फूटापेक्षा कमी उंचीच्या श्रीगणेशमूर्तींचे १४३ इतक्या मोठ्या संख्येने विभागवार बनविलेल्या कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये विसर्जन करुन पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनासाठी योगदान दिले.

त्याचप्रमाणे श्रीमूर्तीसोबत विसर्जनस्थळी आणले जाणारे निर्माल्य ओले व सुके अशा वेगवेगळ्या निम ार्ल्य कलशातच टाकावे या आवाहनालाही नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला. श्रीगणेशोत्सवातील चार विसर्जन दिवसांमध्ये २२ नैसर्गिक व १४३ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ठेवलेल्या निर्माल्य कलशात ६३ टन ६९५ किलो इतके निर्माल्य जमा झाले. हे निर्माल्य संकलित करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने स्वतंत्र निर्माल्य वाहतुक वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती.




अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून सर्व स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांनी स्वच्छताकर्मींसह नियोजनबध्द रितीने ही निर्माल्य संकलन मोहीम नियोजनबध्दरित्या राबविली.

गणेशोत्सवात श्रीमुर्तीसोबत विसर्जनस्थळी येणाऱ्या पुष्पमाळा, फुले, दुर्वा, तुळस, शमी, फळांच्या साली-तुकडे यासारखे पुनर्प्रक्रिया करण्यायोगे 'ओले निर्माल्य' तसेच मुर्तीच्या गळ्यातील कंठी, सजावटीचे सामान असे 'सुके निर्माल्य' ठेवण्यासाठी नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने वेगवेगळ्या निर्माल्य कलशांची व्यवस्था करण्यात आली होती.

अशाप्रकारे ओले व सुके निर्माल्य वेगवेगळ्या कलशात ठेवण्याच्या संकल्पनेला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे यावर्षीच्या श्रीगणेशोत्सव विसर्जन कालावधीत गौरींसह सातव्या दिवसाच्या विसर्जनाप्रसंगी सर्वाधिक २४.४४० टन तसेच दीड दिवसांच्या विसर्जन दिनी १४.२०५ टन निर्माल्य आणि अनंत चतुर्दशी दिनी दहाव्या दिवसाच्या विसर्जनप्रसंगी १४.०७० टन निर्माल्य संकलित करण्यात आले. पाचव्या दिवाशी १०.९८९ टन निर्माल्य संकलीत झाले. अशाप्रकारे संपूर्ण गणेशोत्सव कालावधीत एकूण ६३.६९५ टन इतके निर्माल्य जमा झाले. हे निर्माल्य स्वतंत्र वाहनांद्वारे तुर्भे प्रकल्पस्थळी नेण्यात आले असून त्यावर शास्त्रोक्त खत निर्मिती प्रक्रिया केली जात आहे. यामधून उद्याने फुलविली जाणार आहेत.

याशिवाय डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने धारण तलाव, कोपरखैरणे याठिकाणी त्या स्थळावरचे तसेच कोपरी व महापेगाव तलाव येथील फुलांच्या पाकळ्यांचे निर्माल्य आणले जाऊन निर्माल्यापासून खतनिर्मिती कार्यवाही करण्यात येत आहे.

पर्यावरणशील दृष्टीकोन जपून त्याची प्रत्यक्ष कृतीशील अंमलबजावणी करण्यात नवी मुंबईकर नागरिक नेहमीच सक्रिय सहभागी होत असतात. अशाचप्रकारे गणेशोत्सवातही नागरिकांचा पर्यावरणपूरक सहभाग लाभला असून संकलित झालेल्या निर्माल्यापासून करण्यात येणारी खतनिर्मिती हा त्या पर्यावरणशीलतेचाच एक भाग आहे.

## पोंभुर्णा येथे शासन निर्णयाची होळी




**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.१०, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** मराठा आरक्षण उपसमितीच्या शिफारशीने हैदराबाद गॅजेटच्या नावावर ओबीसी समाजाची दिशाभूल करून बेकायदेशीरपणे उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व निर्णयाचे उल्लंघन करून अक्षय कार्य अशी सगळ्या सूर्याची अधिसूचना कुळ आणि वंशावळीचे नाव घेऊन मराठा जातीला ओबीसीम ध्ये येण्याचा नियमबाह्य कलम कसाही शासन निर्णय रद्द करण्यात यावा. यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष भुजंग ढोले यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष विजय लोणबाळे यांच्या उपस्थित पोंभुर्णा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला व तहसील कार्य लयासमोर शासन निर्णयाची होळी करण्यात आली व तहसीलदार यांच्याकडे निवेदन देण्यात आले. हैदराबाद गॅजेटच्या आड घेऊन शासनाने जो कलम कसाई शासन निर्णय काढण्यात आला. तो निर्णय ओबीसीची फसवणूक करणारा आहे. महाराष्ट्र सरकार मराठा समाजाच्या काही तथाकथित नेत्यांना खुश करण्यासाठी तसेच केवळ मतपेटीच्या आधारासाठी मराठा समाजाला ओबीसी म्हणून आरक्षण देण्याचा प्रकार ओबीसी समाजाची दिशाभूल करणारा आहे मराठा समाजाने ओबीसी म्हणून आरक्षण द्यावे. यासाठी विविध झुंडशाहीचे आंदोलन सुरू केले. म्हणून शासनाने देणे सुरू केले आहे. शासन हे झुंडशाहीच्या आंदोलनावर चालत नसून ते संविधान कायदे व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर चालत असते.मराठा आहे, कुणबी नाही म्हणून ते ओबीसीत नाही. अनेक निकाल यापूर्वी उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. ०५ मे २०२१ चा निकाल मराठी मागास नाही. म्हणून महाराष्ट्र सरकारने त्यांना दिलेले १६ टक्के आरक्षण सुद्धा रद्द केले होते. त्यामुळे मराठा जातीला ओबीसी मध्ये येण्याचा नियमबाह्य कलम शासनाने रद्द करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली.

यावेळी विजय लोणबले, भुजंग ढोले, सद्गुरु ढोले, जगन कोहळे, प्रदीप दिवसे, राहुल सोमनकर, संदीप बुरांडे, प्रमोद गुरनुले, कालिदास मोहरले, भारत गुरुमुले, आदित्य कावडे, वैभव ढोले यांची उपस्थिती होती.

# ओबीसी आरक्षणाला धक्का नाही - अतुल सावे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, ठाणे :** मराठा आरक्षणाबाबत राज्य शासनाने काढलेला शासन निर्णय हा पुराव्यांशी संबंधित असून सरसकट नाही. कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कुठल्याही प्रकारे धक्का बसणार नाही. शासनाच्या विविध योजनांचा उद्देश 'ओबीसी' समाजाला शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम करणे हा आहे. 'ओबीसी' समाजाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शासन पूर्णपणे कटिबद्ध असून सर्व म ागण्यांवर सकारात्मकपणे चर्चा करून निर्णय घेतले जातील, अशी ग्वाही इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भात इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या




अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीस आमदार डॉ. परिणय फुके, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी. धुळाज, राष्ट्रीय महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे उपस्थित आहे.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे म्हणाले, मराठा आरक्षणावरील शासन निर्णय हा सरसकट नसून पुराव्याशी संबंधित




आहे. फक्त कुणबी असल्याचे पुरावे असणाऱ्यांनाच त्याचा लाभ मिळेल. त्यामुळे ओबीसी आरक्षण अबाधित राहील.

राज्यात किती कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत याची संपूर्ण माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. बुधवारी दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक होणार असून त्यात ओबीसी महासंघाच्या मागण्या सविस्तरपणे चर्चे साठी ठेवण्यात येणार आहेत.

सावे म्हणाले की, 'ओबीसी' विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी 'महाज्योती' संस्थेला अधिक सक्षम करण्यात येणार असून, तिच्या कार्यक्षेत्राचा विस्तार करण्यात येईल. परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या 'ओबीसी' विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेत विद्यार्थीसंख्येत वाढ करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नवीन वसतिगृहे सुरू करण्याचे नियोजन केले असून, 'ओबीसी' विद्यार्थ्यांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. प्राप्त मागण्या मंत्रिमंडळ बैठकीत ठेवण्यात येणार असून उर्वरित मागण्यांबाबत एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येतील, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. राज्यातील 'ओबीसी' समाजाच्या विविध मागण्यांवर यावेळी सखोल चर्चा करण्यात आली.

## सेव्ह दिवा फाऊंडेशनची प्रभाग रचना सुधारण्यावर मागणी वार्ड रचना २०१७ प्रमाणेच ठेवावे

**अक्षराज : विनोद वास्कर**


सेव्ह दिवा फाऊंडेशन

**दि.१०, दिवा (ठाणे) :** दिवा परिसरातील प्रभाग रचना सुधारण्याची मागणी सेव्ह दिवा फाउंडेशनने ठामपणे केली आहे. या मागणीला कोणताही राजकीय हेतू नसून दिवा परिसरातील नागरिकांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे हा मुख्य उद्देश असल्याचे फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. रोहिदास बामा मुंडे यांनी सांगितले. २०१७ च्या रचनेप्रमाणे प्रभाग क्रमांक २७ व २८ सलग होते; मात्र नव्या रचनेत प्रभाग २९ मध्ये चुकीच्या पद्धतीने काही भाग टाकल्याने मोठा असंतोल निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रभाग २९ ची लोकसंख्या ३८,१७२ इतकी कमी असून सरासरीपेक्षा जवळपास ४,०००मतदार कमी आहेत. तर प्रभाग ३० मध्ये ६०,१०५ इतकी लोकसंख्या असल्याने २१,९३३ मतदारांचा जास्तीचा भार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार प्रत्येक प्रभागातील लोकसंख्या सरासरीपेक्षा औ१० टक्क्यांच्या मर्यादेत असणे बंधनकारक आहे. मात्र दिव्यातील सध्याची रचना या नियमाचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा करण्यात आला आहे. लोकसंख्येतील समतोल बिघडल्याने नागरिकांना मूलभूत सेवा व प्रतिनिधीत्वात अन्याय होत आहे. एक मत - एक मूल्य हे लोकशाहीचे तत्त्व पाळलेच पाहिजे, असे मुंडे यांनी स्पष्ट केले.फाउंडेशनने प्रशासनाला मागणी केली आहे की, प्रभाग २९ व २८ हे २०१७ प्रमाणे ठेवावेत, तसेच प्रभाग २९ मध्ये सुमारे ७ हजार नागरिकांचा समावेश करून तो कायदेशीर मर्यादेत आणावा.

## करंजेतील ऊस उत्पादकांचे सोमेश्वर कारखानास्थळी उपोषण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, करंजे (बारामती) :** सोमेश्वर-सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यातील कामगार भरतीत शासकीय नियमानुसार अनुशेष न भरल्याचा आरोप करत विविध म ागण्यासाठी करंजे तालुका बारामती येथील ग्रामस्थ आणि ऊस उत्पादक सभासदांनी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर एक दिवसीय लक्षणीय उपोषण केले.

या उपोषणास वीर योद्धा प्रतिष्ठान बारामती तालुकाध्यक्ष अमोल बनसोडे व सर्व पदाधिकारी यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी जाऊन वीर योध्दा प्रतिष्ठान तर्फे जाहीर पाठिंबा दिला व त्यामध्ये सहभागी झाले.

उपोषणकर्त्यांनी सोमेश्वर सहकारी कारखान्यातील कामगार भरती शासकीय नियमानुसार अनुशेष न भरल्याचा आरोप केला यामुळे परिसरातील अनेक कुटुंब रोजगारापासून वंचित राहिल्याचे त्यांनी सांगितले.करंजे गावातील युवकांना कारखान्यात नोकरी न देण्याचा आणि काही घरातील अनेक व्यक्तींना नोकरीवर ठेवण्याचा भेदभाव केल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. या शिवाय सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाकडून करंजे बाग शाळेला सातत्याने सापत्न वागणूक मिळत असल्याचा आरोप करण्यात आला. उपोषण स्थळाकडे कारखाना संचालक मंडळ आणि




प्रशासनाने पाठ फिरवली आहे.

या उपोषणात करंजे गावचे सरपंच भाऊसाहेब हुंबरे, माजी उपसरपंच बुवासाहेब हुंबरे, संताजी गायकवाड, माऊली केंजळ, तंटामुक्त अध्यक्ष सचिन पाटोळे, निरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब शिंदे, ॲड.बाळासाहेब गायकवाड, प्रसाद सोनवणे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## कळवणच्या आश्रमशाळेत विद्यार्थ्याचा मृत्यू

**दि.१०, कळवण :** चणकापूर येथील शासकीय आश्रमशाळेतील रोहित विलास बागूल या तिसरीच्या विद्यार्थ्याचा आजारपणामुळे मृत्यू झाला. घटनेनंतर कुटुंबीय, नातेवाइकांनी मुख्याध्यापकासह अधीक्षकाच्या निलंबनाची मागणी करीत मृतदेह पाच तास मुख्याध्यापकांच्या टेबलावर ठेऊन आक्रोश केला. अप्पर आयुक्त दिनकर पावरा यांनी दोघांचे तत्काळ निलंबन केल्यानंतर नातेवाइकांनी मृतदेह ताब्यात घेतला. रोहितला शुक्रवारपासून ताप, उलट्या आदी त्रास होत होता. अधीक्षक संजय नांदणे यांनी दुसऱ्या विद्यार्थ्याचे पालक गुलाब बागूल यांच्याबरोबर रोहितला घरी पाठवून दिले. घरी गेल्यानंतर तो तापाने फणफणल्याने पालक त्याला मध्यरात्री अभोणा येथे उपचारांसाठी घेऊन गेले. परंतु, रात्री उशीर झाल्यामुळे त्याला उपचार मिळाले नाहीत. रविवारी रात्री उशिरा रोहितचा मृत्यू झाला.

# दुष्काळग्रस्त बीडसाठी विशेष निधी अन् मंजूरी द्या...

### खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांची भेट घेवून केली मागणी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१०, बीड :** बीड जिल्हा दुष्काळग्रस्त आहे. पायाभूत सोयी-सुविधा पण कमी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय ऊर्जा आणि गृहनिर्माण तथा शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दि.१० रोजी खा.सोनवणे यांनी मुंबई येथे मंत्री खट्टर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

बीड जिल्ह्यात विविध विकास योजना राबविणे आवश्यक आहे.



त्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात नवी वीज सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर गावागावात स्थिर वीजपुरवठा व्हावा म्हणून ही गरज आहे. शेतकऱ्यांना सौर पंप (पीएम-कुसुम योजना) शेतीसाठी पाणीपुरवठा सोपा होईल. शहरी भागात स्मार्ट मीटर व भूमिगत केबल वीज चोरी थांबेल आणि सुरक्षित वितरण होईल.सौर-पवन ऊर्जेचे प्रकल्प जिल्ह्याला हरित ऊर्जा उत्पादनाचं नवं केंद्र बनवता येईल. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहरातल्या गरीब व मध्यमवर्गीयांना परवडणारी घरं उपलब्ध होतील. अमृत २.० मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज व स्वच्छता योजना झ्र स्वच्छ वातावरणामुळे आजारपण कमी होईल. बसस्थानक, रस्ते, उद्यानांचं आधुनिकीकरण प्रवास व दैनंदिन सोयीसुविधा सुधारतील. ई-वाहन चार्जिंग हब बीड जिल्हा ई-वाहन वापरासाठी पुढारलेला ठरेल. या प्रकल्पांमुळे बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल आणि जनतेच्या जीवनमानात मोठा फरक पडेल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, खा.सोनवणे हे सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न करत असून केंद्रीय मंत्र्यांकडे ते बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न सातत्याने मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी अनेक मंत्र्यांच्या भेटी घेवून बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे.

# शासनाचे घरकुलसह विविध योजना संदर्भात पंढरपूरात आ.आवताडे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील नागरिकांच्या घरकुल जलजीवन आणि अहिल्यादेवी सिंचन विहीर या संदर्भातील अडीअडचणी सोडवण्यासाठी बुधवारी पंढरपूर पंचायत समिती येथील शेतकी भवन येथे आमदार समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. आढावा बैठकीच्या सुरुवातीला आमदार समाधान आवताडे यांनी घरकुल, अहिल्यादेवी सिंचन विहिरी आणि जल जीवन योजनेचा आढावा संबंधित अधिकाऱ्यांकडून घेऊन नागरिकांकडून समस्या जाणून घेतल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटशिक्षणाधिकारी सुशील संसारे उपस्थित होते. या बैठकीसाठी मोठ्या संख्येने पंढरपूर तालुक्यातील नागरिक उपस्थित होते. सदर आढावा बैठकीदरम्यान पंढरपूर मतदार संघातील नागरिकांनी आमदार आवताडे यांच्यासमोर समस्यांचा पाढा वाचला. नागरिकांच्या अडी-अडचणी जाणून घेऊन आमदार आवताडे यांनी संबंधित अधिकारी आणि तक्रारदार नागरिक गावातील सरपंच यांना समोरासमोर बोलावून लवकरात लवकर तोडगा काढून प्रश्न सोडवण्याच्या सूचना संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या.

याप्रसंगी बोलताना आमदार समाधान आवताडे यांनी भारतीय जनता पार्टीच्या सरकारने राज्यातील नागरिकांसाठी शासनाच्या घरकुल आणि अहिल्यादेवी सिंचन विहीर या योजना राबवल्या जात आहेत. या सर्व योजना नागरिकांपर्यंत विनाअडथळा पोहोचवाव्यात मतदार संघातील काही गावामध्ये विहिरीच्या लाभार्थी अत्यंत कमी प्रमाणात असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना लाभार्थी वाढविण्यासाठी सूचना दिल्या यासाठी आढावा बैठकीच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्यांवर तोडगा काढून प्रश्न सुटावेत यासाठी या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शेततळ्यासाठी जादा अनुदान मिळावे. यासाठी सभागृहात कृषिमंत्र्याकडे पाठपुरावा करायला असल्याचे सांगितले. तसेच मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना विहीर मंजूर करण्यात यावी. याचबरोबर जल जीवन मिशन अंतर्गत होणारी कामे दर्जेदार पद्धतीचे करून घ्यावीत. जलजीवन कामाच्या योजनेत उदासीनता असल्याने खंत व्यक्त करत यांनी कामे पूर्ण झाल्याशिवाय बिल देऊ नयेत. झालेल्या कामाचा दर्जा तपासावा अशा सूचना केल्या. मतदार संघातील ज्या लोकांच्या जल जीवन योजनेबाबत तक्रारी आहेत अशा नागरिकांनी माझ्याकडे लेखी स्वरूपात अर्ज द्यावेत त्यावरती मी लवकरच कार्यकारी अभियंता सह संबंधित सर्व अधिकारी व ठेकेदार यांच्या समवेत बैठक घेणार असल्याचे सांगितले.

यावेळी त्यांनी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे एकही घरकुल रद्द करू नये. जागेची समस्या असल्यास त्यावर योग्य तोडगा काढून गायरान, गावठाण यामध्ये



जागा घरकुलासाठी उपलब्ध करून द्यावी. जागेसाठी शासनाकडून देण्यात येणारी आर्थिक मदत घेऊन घरकुल पूर्ण करावे. घरकुल बांधकामासाठी शासनाच्या वतीने देण्यात येणारी मोफत वाळू माती मिश्रित न देता चांगल्या पद्धतीची द्यावी. घरकुल योजनेचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांना देण्यात यावा. यावेळी घरकुल योजनेतील लाभार्थ्यांच्या जागेच्या अडचणी बाबत प्रांताधिकारी तहसीलदार गटविकास अधिकारी यांनी संयुक्तपणे बसून अडचणी दूर करून यातील एक ही घरकुल माघारी जाणार नाही याची दक्षता घ्यावी. अशी अपेक्षा व्यक्त करत शासनाच्या घरकुल, जलजीवन, अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना नागरीकांपर्यंत विनाअडथळा पोहोचवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनेतून होणारी कामे दर्जेदार पद्धतीने करून घेण्याचे आवाहन केले. यावेळी नागरिकांनी समस्या जाणून घेतल्याबद्दल आमदार आवताडे यांचे आभार मानले.

# पारनेर तालुक्यात मुख्यमंत्री समुद्ध पंचायतराज अभियानाचे 'तीन तेरा'

## कार्यक्रमाला लोकप्रतिनिधींची पाठ; सीईओ भंडारी यांनी व्यक्त केली नाराजी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण विकासाचा कणा मानल्या जाणाऱ्या पंचायतराज व्यवस्थेची विचारधारा देशाला देणाऱ्या पारनेर तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याने या अभियानाचे तालुक्यात तीनतेरा वाजल्याचे चित्र आहे.

याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी नाराजी व्यक्त करत पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची परखड शब्दांत कानउघाडणी केली.

दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी पारनेर येथील गणेश मंगल कार्यालयात जिल्हा परिषद व पंचायत समितीतर्फे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळेत भंडारी बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी दयानंद पवार, चांभुर्डीकर महाराज, सरपंच बाजीराव दुधाडे, रोजगार कक्ष प्रमुख एपीओ कारखिले, ग्रामविकास अधिकारी शिवाजी खामकर आदी उपस्थित होते. मात्र, तालुक्याचे खासदार व आमदार या महत्त्वाच्या कार्यक्रमाला अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या विकासाबाबतच्या आस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

पंचायतराज ही लोकशाहीचा पाया असून, स्थानिक स्वराज्य संस्थांनी ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलला आहे. गावाचा विकास केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून, सर्वांगीण प्रगती साधणे अपेक्षित आहे. मात्र, समाजसेवक अण्णा हजारे व आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या पारनेर तालुक्यात या अभियानाला उदासीन प्रतिसाद मिळत असल्याचे भंडारी यांनी नमूद केले. तालुक्यात तक्रारींचे प्रमाण ही जास्त असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सीओ भंडारी म्हणाले, प्रत्येक नागरिक व घटक या अभियानाशी जोडला गेल्याने यश मिळेल. गावात हजारो-करोडो रुपयांचा निधी येऊ शकतो, पण त्यासाठी सरपंच, सदस्य आणि ग्रामसेवकांनी सक्रिय राहणे गरजेचे आहे. त्यांनी करवसुलीवर लक्ष देणे, गावचा विकास साधणे आणि पर्यावरण रक्षणाच्या सूचना केल्या. ग्रामपंचायतींना खर्चाची मुभा असल्याने त्याचा योग्य वापर करावा असेही ते म्हणाले.

दरम्यान, निवडणूक काळात मतांसाठी सक्रिय असणारे नेते या नियोजित कार्यक्रमाला अनुपस्थित राहिल्याने उपस्थितांमध्ये त्याबाबतची चर्चा ही चांगलीच रंगली. तालुक्याच्या विकासासाठी नेत्यांची अनास्था आणि अभियानाला मिळणारा थंड प्रतिसाद यामुळे पारनेर तालुका मागे पडत असल्याची खंत व्यक्त होत आहे.

# भारताने यजमान युएईला चारली धुळ, फक्त २७ चेंडूंतच मिळवला दिमाखदार विजय

**दि.१०, दुबई :** चॅम्पियन संघाचा खेळ कसा असावा तर भारतीय संघासारखा. कारण आपल्या पहिल्याच सामन्यात भारताने यजमान युएईचा चांगलाच पाहुणचार घेतल्याचे पाहायला मिळाले. भारताने अचूक आणि भेदक गोलंदाजी करत ५७ धावांतच ऑल आऊट केले. भारतासाठी हे आव्हान माफक दिसत होते. भारताच्या फलंदाजांनी धडाकेबाज फलंदाजी करत हे आव्हान लीलया पार केले आणि आशिया कपमध्ये विजयाचा श्रीगणेशा केला. भारताने यावेळी फक्त २७ चेंडूंतच विजय साकारत हा सामना ९ विकेट्स राखून जिंकला. अभिषेक शर्माने यावेळी ३० धावा केल्या, पण तो बाद झाला. पण शुभमन गिलने नाबाद २० धावांची खेळी साकारली, तर संजू सॅमसनने नाबाद सात धावा केल्या. भारताने या विजयासह दोन गुण मिळवले.




भारतासाठी सामना सुरुवात होण्यापासूनच एकामागून एक गोष्टी चांगल्या घडत गेल्या. भारताने टॉस जिंकला आणि सूर्याने गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराहने या सामन्यात भारताला पहिले यश मिळवून दिले. बुमराहने युएईची पहिली विकेट २६ धावांवर घेतली आणि त्यानंतर त्यांचा डाव पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. कारण त्यानंतर भारताच्या फिरकीपटूंनी युएईला एकामागून एक जोरदार धक्के दिले.

भारतासाठी यावेळी कुलदीप यादव नायक ठरला. कारण कुलदीप यादवने यावेळी युएईचा कर्णधार मोहम्मद वसीम, राहुल चोप्रा, हर्षित कौशिक आणि हैदर अली या चारही फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. कुलदीप यादवने यावेळी फक्त १३ चेंडू टाकले. या १३ चेंडूंत कुलदीपने फक्त सात धावा दिल्या आणि चार बळी मिळवले. कुलदीपला यावेळी सुयोग्य साथ दिली ती मध्यमगती गोलंदाज शिवम दुबेने. कारण शिवमने यावेळी फक्त दोन षटकं गोलंदाजी केली. या दोन षटकांत त्याने फक्त चार धावा दिल्या आणि तीन विकेट्स मिळवल्या. या सामन्यात वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनीही प्रत्येकी १-१ विकेट मिळवली. पण हार्दिक पंड्याला यावेळी एकही बळी मिळवता आला नाही.

भारतासाठी शुभमन गिल आणि अभिषेक शर्मा हे सलामीला आले. या दोघांनी धडाकेबाज सुरुवात भारताला करुन दिली. अभिषेक शर्माने तर पहिल्या दोन चेंडूंतच १० धावा केल्या. शुभमन गिलनेही यावेळी दमदार फलंदाजी करत आपली निवड सार्थ ठरवली. भारताने पहिल्या सामन्यातच एवढा मोठा विजय साकारला. त्यामुळे आता पाकिस्तानच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाचे मोनबल नक्कीच उंचावलेले असणार आहे.

# पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना गृहकर्ज मंजुरीबाबत आ.मुनगंटीवार यांनी घेतली भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुंबई मंत्रालय येथे वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता यांची भेट घेतली. या भेटीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला घरबांधणीसाठी डीजी लोन मंजुरीच्या प्रश्नावर आ.मुनगंटीवार यांनी सविस्तर चर्चा केली. या विषयाची दखल घेत अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता यांनी तातडीने यासंदर्भात तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रात्रंदिवस कार्यरत असलेल्या पोलिस बांधवांसाठी गृहकर्जाची समस्या गंभीर बनली आहे. राज्यातील सुमारे ५५०० पोलीस कर्मचाऱ्यांचे गृहकर्ज (डीजी लोन) ऑगस्ट २०२३ पासून प्रलंबित आहे. अनेकांनी उसनवारी करून इमारत बांधकाम करणाऱ्या बिल्डरांना टोकन रक्कम दिली आहे. मात्र कर्ज मंजुरी विलंबित झाल्यामुळे ही रक्कम गमावण्याची वेळ पोलीस कर्मचाऱ्यांवर येत असून, त्यामुळे ते आर्थिक व मानसिक तणावाखाली आले आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आ. मुनगंटीवार यांनी या पार्श्वभूमीवर मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे नागपूर येथे मागणी केली होती. मा. मुख्यमंत्र्यांनी त्वरित दखल घेत अपर मुख्य सचिवांना सदर विषयाची चौकशी करून तात्काळ कारवाईचे निर्देश दिले होते. यासंदर्भात आज वित्त विभागाचे सचिव ओ.पी.गुप्ता यांची मंत्रालय येथे भेट घेऊन चर्चा केली.

याप्रसंगी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी गृहकर्जाशी संबंधित अडथळ्यांमुळे पोलीस बांधवांच्या घराचे स्वप्न अपूर्ण राहू नये, यासाठी तातडीने निर्णय घेऊन योग्य तो दिलासा देण्याची विनंती केली. अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता यांनी या विषयाची दखल घेत तातडीने सकारात्मक कार्यवाही करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या भेटीनंतर राज्यातील पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना गृहकर्ज मंजुरीचा मार्ग मोकळा होऊन त्यांच्या घराच्या स्वप्नपूर्तीसाठी दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# थोडक्यात

## कामगार नेते रासकर यांचे उपोषण सुरू; सुपा टोलनाका त्वरित बंद करा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर - शिरूर महामार्गावर निकृष्ट दर्जाच्या रस्त्यावरील सुपा टोलनाका कायम स्वरूपी बंद करावा, या प्रमुख मागणीसाठी कामगार नेते रविश रासकर यांनी दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ पासून उपोषण सुरू केले आहे. आत्ताच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार अहिल्यानगर - शिरूर हा रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा झालेला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. ठिकठिकाणी अनधिकृत डिव्हायडर फोडलेले आहेत. कुठल्याही चौकामध्ये गावचे दिशादर्शक फलक नाही. रस्त्याच्या कडेने वृक्ष लागवड इस्टिमेट मध्ये असताना ही कुठेही वृक्ष लागवड झालेली नाही. रात्री रस्त्यावर गाड्या चालविताना साईडने पांढरा साईड पट्ट्या नसल्याने वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही व अपघात होऊन मनुष्यहानी होत आहे. रस्त्यावर डांबरीकरणाचा लेअर देणे गरजेचे असताना संबंधित कंपनी रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे लेअर देत नाहीत. रस्त्यावर अपघात झाल्यानंतर सुपा टोलनाक्यावर कुठल्याही इमर्जन्सी सुविधा उपलब्ध नाहीत. अँब्युलन्स, क्रेन, जेसीबी ही कुठल्याही सुविधा उपलब्ध नसल्याकारणाने सुपा टोलनाका त्वरित बंद करण्यात यावा यासाठी कामगार नेते रविश रासकर यांच्या सहकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी हे बेमुदत आमरण सुरू केले आहे.

## एकाच आठवड्यात बिबट्याचा हल्ल्यात दोघांचा मृत्यू



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** सिद्धेश्वरवाडी रस्त्यावरील बारामती ॲग्रो परिसरात दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास एका ३ वर्षीय बालकावर बिबट्याने हल्ला करून त्याला जंगलाकडे ओढून नेल्याची धक्कादायक घटना घडली होती. दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी घटनास्थळापासून एक किलोमीटर अंतरावर झाडाझुडपात त्याचा मृतदेह आढळला.

अमन पन्नूलाल खोटे (वय ३) असे मृत्यू झालेल्या बालकाचे नाव आहे. बांधकाम मजूर असलेल्या परप्रांतीय कुटुंबातील अमन लघुशंकेसाठी घराबाहेर आला असताना, आईच्या डोळ्यासमोरच बिबट्याने त्याच्यावर झडप घेतली. स्थानिकांनी तात्काळ वनविभागाला याबाबत माहिती दिली. वनविभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली, ज्यात स्थानिक नागरिकही सहभागी झाले. रात्री उशिरापर्यंत शोधकार्य सुरू होते. दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता सिद्धेश्वरवाडी परिसरातील जंगलात, घटना स्थळापासून एक किलोमीटर अंतरावर झाडाझुडपात अमनचा मृतदेह आढळला. शोध मोहिमेत वनपरिक्षेत्र अधिकारी जी.व्ही.धाडे, वनपाल एम.वाय. शेख, वनरक्षक अफसर पठाण, फारुख शेख, कानिफनाथ साबळे, एस.के.कारले, साहेबराव भालेकर, अंकराज जाधव यांनी सहभाग घेतला. बिबट्याला पकडण्यासाठी परिसरात पिंजरे लावण्यात आले असून, गस्त वाढवली आहे.

तालुक्यात यापूर्वी नुकतीच ०२ सप्टेंबर २०२५ ला कळस येथेही अशीच बिबट्याच्या हल्ल्याची दुर्दैवी घटना घडली होती. त्यात गणेश गाडगे (वय ४०) या व्यक्तीचा मृत्यू झाला होता. एका आठवड्यात तालुक्यातील दोन घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पाळीव प्राण्यांवरील बिबट्याच्या हल्ल्यांमुळे ही चिंता वाढली आहे. वन्यप्राण्यांचा मानवी वस्तीत वाढता प्रवेश चिंताजनक ठरत आहे. वन विभागाने नागरिकांना रात्री सावध राहण्याचे आणि लहान मुलांना एकटे न सोडण्याचे आवाहन केले आहे. या घटनेचा तपास सुरू असून, परिसरात सतर्कता बाळगण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## गर्भलिंग निदान, गर्भपाताविरोधात आता कडक कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर करुन बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान व गर्भपात करणे हा कायद्याने गुन्हा आहे, असे करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याचा निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात आयोजित या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, डॉ. भास्कर सोनारकर, डॉ. नयना उत्तरवार, तसेच आरोग्य विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यात अवैध गर्भलिंग निदान केंद्राविषयी माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, माहितीच्या आधारे खातरजमा होऊन संबंधित व्यक्ती किंवा केंद्राविरुध्द खटला दाखल झाल्यास माहिती देणाऱ्यास शासनातर्फे १ लाख रुपये व महानगरपालिकेतर्फे २५ हजार रुपये, असे एकूण १ लाख २५ हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येईल. तसेच स्ट्रींग ऑपरेशनसाठी सहभागी होणाऱ्या गर्भवती महिलेस न्यायालयीन खटला दाखल झाल्यानंतर शासनातर्फे १ लाख व महापालिकेतर्फे २५ हजार रुपये, असे एकूण १ लाख २५ हजार रुपयाचे बक्षिस मिळणार आहे. सर्व अल्ट्रासाऊंड केंद्रे, रुग्णालये व दवाखान्यांची काटेकोर तपासणी करावी, बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्यांविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी स्ट्रींग ऑपरेशन वाढविणे, सर्व सोनोग्राफी केंद्राची दर तीन महिन्यांनी तपासणी करणे तसेच १२ आठवड्यांपेक्षा अधिक गर्भपात कपणाऱ्या केंद्रांना आवर्जून भेट देण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार सर्व कागदपत्रे, अहवाल व नोंदवही काटेकोर तपासावीत. यामध्ये निष्काळजीपणा होऊ नये, आवश्यकतेनुसार पोलीस विभाग व इतर शासकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य घ्यावे, असेही त्यांनी सुचविले.

गर्भलिंग निवडीच्या प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी जनजागृतीबरोबरच कायद्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने मुलगी वाचवा, मुलगी शिकवा, या अभियानासाठी हातभार लावावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.